सातारा, शनिवार, २३ सप्टेंबर २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

अवतीभवती



कोरेगाव : राष्ट्रीय स्पर्धेसाठी गणेश खताळ यास शुभेच्छा देताना डॉ. विजयसिंह सावंत, प्रा. बाळकृष्ण भोसले आदी.

## राष्ट्रीय योगा स्पर्धेसाठी खताळची निवड

कोरेगाव, ता. २२ : येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील गणेश खताळ या विद्यार्थ्याची भुवनेश्वर येथे होणाऱ्या राष्ट्रीय योगा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. राष्ट्रीय स्तरावर सलग तिसऱ्यांदा त्याची निवड झाली आहे. गणेशने मुरगुड (कोल्हापूर) येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय योगा स्पर्धेत चौथा क्रमांक मिळवला आहे. आता ओडिशामधील भुवनेश्वर येथे राष्ट्रीय योगा स्पर्धा होणार आहे. त्यास क्रीडाशिक्षक प्रा. बाळकृष्ण भोसले व प्रा. अरुण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले आहे. राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, सहसचिव प्राचार्य विजयसिंह सावंत यांनी गणेशचे अभिनंदन केले आहे.